# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०१७ / श्रावण २, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | आदिवासी विकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उद्योग व खनिकर्म मंत्री | |
| (३) | ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री | |
| (४) | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री | |
| (५) | सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील केंद्रीय अनुसूचित जातीच्या ३२२ आश्रमशाळांना १०० टक्के अनुदान न मिळाल्याबाबत

**(१) * ८६६५२ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्रीय अनुसूचित जातीच्या ३२२ आश्रमशाळांना १०० टक्के अनुदान न मिळाल्यामुळे या शाळांतील साडेपाच हजार शिक्षक मागील काही

वर्षांपासून विनावेतन काम करीत असल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शिक्षकांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असून याबाबत शासनाच्या होत असलेल्या दिरंगाईमुळे हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयाच्या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यातील ३२२ आश्रमशाळांना राज्य शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी केवळ ३४ आश्रमशाळांना केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होत आहे. त्यामुळे राज्यातील सर्वच ३२२ आश्रमशाळांना राज्य शासनाचे अनुदान मिळावे म्हणून विविध संघटनांमार्फत राज्य शासनाकडे मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे केंद्रीय अनुसूचित जातीचे आश्रमशाळांच्या अनुदानाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणात काजूच्या बोंडापासून मद्यनिर्मिती करण्यास परवानगी देणेबाबत

**(२) * ८५५४४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात काजूचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते तथापि दरवर्षी सुमारे ४० लाख टन काजूची बोंडे वाया जात आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोवा राज्याच्या धर्तीवर काजूबाबतचे धोरण खुले करुन काजूच्या वाया जाणाऱ्या बोंडापासून मद्यनिर्मिती करण्यास परवानगी दिल्यास कोकणातील हजारो तरुणांना रोजगार उपलब्ध होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काजूच्या बोंडापासून मद्यनिर्मिती करण्यास परवानगी देणे ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दि.८ मार्च, २००० च्या शासन निर्णयान्वये मळीव्यतिरिक्त इतर पदार्थापासून मद्यार्क निर्मिती करण्यासाठी आसवनी अनुज्ञप्ती देणे व सदर मद्यार्कापासून पेय मद्य निर्मितीसाठी अनुज्ञप्ती देण्याबाबतचे धोरण आहे.

-----------------

## सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सिध्दापूर व सलगर (ता.मंगळवेढा) या शाखेने शेतकऱ्यांची पिक विम्याची रक्कम कर्जखात्यात जमा केल्याबाबत

**(३) * ८७९५३ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांच्या पिक विम्याची रक्कम कर्जासाठी कपात न करता शेतक-यांना द्यावी असे आदेश शासनाने जिल्हा बँकांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन आदेशाचे उल्लंघन करुन सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सिध्दापूर व सलगर (ता.मंगळवेढा) या शाखेने पिकविम्याची रक्कम शेतक-यांच्या कर्जखात्यात जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शाखेअंतर्गत येणा-या मंगळवेढा तालुक्यातील १६ गावातील शेतक-यांनी, उक्त बँकेने पिक विम्याची रक्कम शेतक-यांना विश्वासात न घेता परस्पर त्यांच्या कर्जखात्यात टाकल्याने ती परत मिळावी अशी मागणी जिल्हा उपनिबंधक व तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बँकेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना परत करण्याच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मंगळवेढा तालुक्यातील एकूण १०८ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी ७८ शेतकऱ्यांच्या पीक विम्याच्या रकमा बँकेने परत केलेल्या आहेत. उर्वरीत ३० शेतकऱ्यांना अद्याप रकमा परत मिळालेल्या नाहीत. सदर कृतीबाबत संबंधितांविरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी बँकेचे चेअरमन / सरव्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सोलापूर यांना दिनांक २९/०६/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोयना (ता.कराड, जि.सातारा) जल विद्युत प्रकल्पातील वीज निर्मिती बंद करण्यात आल्याबाबत

**(४) * ८५९८३ श्री.अजय चौधरी (शिवडी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना (ता.कराड, जि.सातारा) वीज प्रकल्पाची १९०० मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता असतांनाही माहे मे, २०१७ पासून केवळ १५० ते २०० मेगावॅट वीज निर्मिती होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार धरणातील ६७.५० टीएमसी पाणी एवढेच पाणी वीज निर्मितीसाठी दिनांक १ जून ते ३१ मे या कालावधीत वापरण्याचे बंधन असतानाही माहे एप्रिल, २०१७ अखेर महाजनकोने सुमारे ६७.२५ टीएमसी पाणी वापरले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या धरणात केवळ ०.२५ टीएमसी एवढेच वीज निर्मितीसाठी पाणी शिल्लक असल्याने ते मे महिन्यात वापरण्याच्या दृष्टीने महाजनको यांनी टप्पा - ४ ची वीजनिर्मिती बंद केल्यामुळे भारनियमन मोठ्या प्रमाणात करावे लागत असून राज्यातील कृषी पंप तसेच लघु उद्योगावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊन नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार भारनियमन कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महानिर्मिती कोयना जलविद्युत संकुलाची, एकूण वीजनिर्मिती क्षमता १९५६ मेगावॅट असून जल वर्षाकरिता ६७.५ टी.एम.सी. इतका पाणीसाठा वीजनिर्मितीसाठी उपलब्ध असतो. महावितरण द्वारे राज्याच्या वीजमागणीनुसार, राज्य भार प्रेषण केंद्र (SLDC) कळवा, मुंबई यांचे मार्फत कोयना जलविद्युत येथील वीज संच चालविण्याबाबतच्या सूचना दिल्या जातात.
माहे-मे २०१७ मध्ये कोयना जल विद्युत प्रकल्पातील सर्व विद्युत संच वीजनिर्मितीसाठी उपलब्ध होते. सदर कालावधीमध्ये राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे एकूण १००.९२१ द.ल.युनिट (सरासरी दररोज १३५ मेगावॅट) एवढी वीजनिर्मिती करण्यात आली.
(२) माहे एप्रिल-२०१७ अखेर ६५.८५९ टी.एम.सी. इतक्या पाण्याचा वापर वीजनिर्मितीसाठी झाला आहे.
(३) एप्रिल, २०१७ अखेर कोयना धरणात १.६४१ टी.एम.सी. पाणी वीजनिर्मितीसाठी शिल्लक होते. तथापि, राज्याच्या वीज मागणीनुसार राज्य भार प्रेषण केंद्र (SLDC) कळवा, मुंबई यांचे मार्फत कोयना जल विद्युत केंद्र येथील संच चालविण्याबाबत सूचना दिल्या जातात.
(४) व (५) महावितरण कंपनीने सर्व स्त्रोत्रांकडून उपलब्ध असलेली वीज व मागणी याचा ताळमेळ घालून देखील कोळशावर आधारित संच तांत्रिक कारणामुळे बंद पडणे, कोळसा कमी उपलब्ध झाल्याने वीज निर्मिती कमी होणे या कारणामुळे वीजेच्या उपलब्धतेत अनपेक्षित कमतरता निर्माण झाली होती. तसेच तापमानातील बदलामुळे वीजेची मागणी देखील वाढली होती. यामुळे राज्यात माहे एप्रिल व मे २०१७ या महिन्यात दिनांक २७.०४.२०१७ ते

०६.०५.२०१७ या कालावधीत भारनियमनाची परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु महावितरणने व्दिपक्ष कराराव्दारे ५०० मे.वॅ. वीज उपलब्ध करुन घेतली तसेच बँकींग पध्दतीने करार करुन माहे एप्रिल व मे महिन्यामध्ये मागणीच्या वेळी २०० ते ३०० मेगा वॅट वीज उपलब्ध करुन घेतली. घाटघर विद्युत निर्मिती केंद्राचा प्रभावी वापर आणि आवश्यक त्या तासांसाठी पॉवर एक्सेंज मधून ३०० ते १,८०० मे.वॅ. पर्यंत वीज खरेदी करुन वीजेची तूट भरुन काढली. तसेच दिनांक ०७.०५.२०१७ पासून भार नियमन करण्यात आलेले नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) येथील रुपी बँकेचे सर्व व्यवहार बंद झाले असून ठेवीदारांच्या ठेवी (रकमा) धोक्यात आल्या असल्याबाबत

**(५) * ८६३१२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) येथील रुपी बँकेचे सर्व व्यवहार बंद झाले असून ठेवीदारांच्या ठेवी (रक्कम) धोक्यात आल्याची बाब दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेवीदारांच्या रकमा तातडीने परत मिळाव्या आणि तत्कालीन संचालकांवर कारवाई करण्यासाठी विविध मागण्यांचे ६०० ठेवीदारांच्या सह्यांचे निवेदन माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून यामध्ये ठेवीदारांचे हाल होत असून या ठेवीदारांमध्ये ज्येष्ठांचे प्रमाण सर्वाधिक असताना या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

रुपी को.ऑप बँकेवर रिझर्व्ह बँकेने दिनांक २२.२.२०१३ पासून आर्थिक निर्बंध आणले आहेत.

(२) रुपी बँक ठेवीदार हक्क समितीने दिनांक १३.५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये बँकेच्या ठेवीदारांच्या अडचणींचे निराकरण करणेबाबत ३०९ ठेवीदारांचे निवेदन शासनास तसेच सहकार आयुक्त कार्यालयास दिले आहे.

(३) रिझर्व्ह बँकेने त्यांच्या दिनांक १७.३.२०१५ रोजीच्या आदेशान्वये हार्डशीप मधील ठेवींचे मंजूरीचे अधिकार बँकेच्या प्रशासकीय मंडळास दिले आहेत. तद्नंतर बँकेच्या ६३,६२४ ठेवीदारांना रु. २५५.१२ कोटी इतक्या रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे. तसेच रु. ५०००/- पर्यंत ठेवी असणाऱ्या ३१४७ ठेवीदारांना रु. ८२.१९ लाख इतक्या रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील खाजगी वीजनिर्मिती कंपन्यांनी करारापेक्षा कमी वीज दिल्याबाबत**

**(६) * ८५००७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विजेची वाढती मागणी व महानिर्मितीच्या तुलनेने महाग वीज या पार्श्वभुमीवर अनेक खाजगी वीजनिर्मिती कंपन्यांसोबत कंपनीने करार केल्यानंतरही अदानी आणि इंडियाबुल्स या कंपन्यांनी करारापेक्षा कमी वीज दिल्याने विदर्भासह राज्यात मोठया प्रमाणात भारनियमनाची परिस्थिती निर्माण झाल्यामूळे विदर्भात दररोज १२ ते १८ तासाचे भारनियमन करण्यात येत असल्याची माहिती दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी वीज कंपन्या महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या नियमांचा लाभ घेत असल्याने त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार करारापेक्षा कमी वीज दिल्याने संबधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) माहे एप्रिल, २०१७ मध्ये तापमानातील बदलामुळे वीजेच्या मागणीत सर्वसाधारण २००० मे.वॅ. वाढ झाली होती. महावितरण कंपनीची वीजेची सरासरी कमाल मागणी १८,००० ते १८,५०० मे.वॅ. एवढी होती.

वीजेच्या मागणीत झालेली मोठी वाढ व तांत्रिक कारणास्तव उपलब्धतेत झालेली घट यामुळे राज्यात माहे एप्रिल, २०१७ मध्ये दिनांक २७ एप्रिल ते ३० एप्रिल, या कालावधीत भारनियमनाची परिस्थिती निर्माण झाली होती.

(२) व (३) तांत्रिक कारण, कोळशाची अनउपलब्धता तसेच इतर कारणांमुळे करारानुसार वीज पुरवठा करण्यात झालेली कमतरता यासंदर्भात महावितरणने वीज उपलब्धता व त्याअनुषंगिक विनियमात सुधारणा करण्याबाबतची याचिका मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाखल केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यात करंजाडे नोडमध्ये डिपीमधील अर्थिंगचा शॉक लागून एका तरुणाचा झालेला मृत्यू**

**(७) * ८५०८१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात करंजाडे नोडमध्ये सिडको व महावितरण कंपनीच्या दुर्लक्षामुळे सेक्टर ५ व ६ येथे अनाच्छादित असलेल्या डिपीमधील अर्थिंगचा शॉक लागून आनंद वाघे या आदिवासी तरूणाचा मृत्यु झाला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे हे काय,

(२) असल्यास, पनवेल तालुक्यात अनाच्छादित ठेवण्यात आलेल्या डिपींची संख्या मोठया प्रमाणात असून अशा प्रकारचे अपघात वारंवार घडत असून डिपी बंदिस्त करण्याची मागणी यापूर्वीही वारंवार करुन सुद्धा संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी तरूणाच्या झालेल्या मृत्यु प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी केली असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) उघडया डि.पी च्या संपर्कात येऊन यापूर्वी पनवेल तालुक्यात विद्युत प्राणांतिक अपघात घडलेला नाही.

(३) विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग, रायगड पेण यांच्यामार्फत सदर प्राणांतिक अपघाताची चौकशी दि. १७/०६/२०१७ रोजी करण्यात आली असून अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पनवेल-१, महावितरण यांना दि. २७/०६/२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच अपघातग्रस्त मृताच्या वारसास नुकसान भरपाई देण्याबाबत दि.२७/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये महावितरण कंपनीस कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतमालाला हमीभाव देण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या शिफारशींबाबत

**(८) * ८८४११ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतमालाला हमीभाव देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यकारी संचालकांच्या अध्यक्षतेखाली माहे एप्रिल, २०१७ मध्ये समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशवंत मालाची काढणी, काढणी पश्चात हाताळणी, विक्री व्यवस्थेचा अभाव, विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची साखळी, शीतगृहांचा अभाव इ. कारणांमुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान यावर उपाययोजना सुचविण्यासाठी समितीने सविस्तर अभ्यास करून २ महिन्यात अहवाल सादर करावा असे निर्देश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीने अहवाल सादर करून कोणत्या शिफारशी शासनास केल्या आहेत व शिफारशी स्वीकारून शासनाने कोणत्या निर्णयात्मक उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) शेतमालाला हमी भाव देण्यासाठी समिती गठीत केलेली नाही. मात्र, नाशवंत शेतमालाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४/४/२०१७ रोजी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३) व (४) समितीने अद्याप आपला अहवाल शासनास सादर केलेला नाही.

-----------------

**पेण अर्बन बँक (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील ठेवीदारांनी गुंतवणूक केलेले पैसे मिळणेबाबत**

**(९) * ८४९९२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण अर्बन बँक (ता.अलिबाग, जि.रायगड) या बँकेतील संचालकांनी सन २०१० मध्ये ७५८ कोटींचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी बँक बंद झाली असून मागील सात वर्षापासून गुंतवणूक केलेले पैसे अद्याप मिळाले नसल्याने ठेवीदारांनी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेवीदारांचे पैसे मिळविण्यासाठी, मा.न्यायालयाने, रायगड जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या पेण बँक तपास विशेष कृती समितीने अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही न करण्याची व त्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने ठेवीदारांचे पैसे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) विशेष कृती समितीच्या सूचनेनुसार बँकेतील १२८ बोगस कर्जखात्यांचा तपास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या तपास पथकास सहाय्य करण्यासाठी १ विशेष लेखा परिक्षक व ४ लेखापरिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

वरील बोगस खात्यांच्या तपासामधून जप्त करण्यात आलेली रक्कम रु. २.२१ कोटी जिल्हा सत्र न्यायालय, अलिबाग येथे जमा करण्यात आली असून सदर रक्कम बँकेकडे वर्ग करण्यासाठी विशेष कृती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही सुरु आहे.

समितीच्या सूचनेनुसार सक्षम अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी तत्कालीन संचालकांच्या १९४ मालमत्तांवर एमपीआयडी कायदा, १९९९ अंतर्गत कार्यवाही सुरु केली आहे.

(४) विशेष कृती समितीच्या सूचनेनुसार बँकेकडील उपलब्ध निधीतून जास्तीत जास्त ठेवीदारांना ठेवी वाटप करण्यासाठी मा. उच्च न्यायालय ,मुंबई यांचेकडे विनंती केली असून मा. उच्च न्यायालयाने दिनांक २८.४.२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार बँकेच्या सर्व शाखांमधून रु. १०,०००/- ते रु. २५,०००/- इतक्या रक्कमेच्या ठेवी असणाऱ्या ठेवीदारांना रक्कम वाटप करण्याचे कामकाज दिनांक २७.६.२०१७ पासून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट (जि.वर्धा) येथे विद्युत वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गैरकारभाराबाबत

**(१०) * ८८५१४ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिह्यातील हिंगणघाट येथे विद्युत वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचा-यांच्या बेजबाबदार कारभाराला कंटाळून स्थानिक नागरिकांनी वीज वितरण कंपनीच्या हिंगणघाट येथील कार्यालयावर मोर्चा काढल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रामुख्याने वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याबाबत हा मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) जून, २०१७ महिन्यामध्ये आलेल्या वादळी वारे व पावसामुळे हिंगणघाट तालुक्यामध्ये काही ठिकाणी वीज वाहिनीचे खांब पडून व वीजवाहक तारा तुटल्यामुळे वीज पुरवठा विस्कळीत झाला होता. त्याअनुषंगाने ग्राहकांच्या तक्रारी व निवेदने महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाली होती.
(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारींवरुन पडलेले वीज खांब व तुटलेल्या वाहिन्या जलद गतीने पूर्ववत करण्यासाठी मंडल कार्यालय, वर्धा येथील अधिक्षक अभियंता हिंगणघाट यांच्या अधिपत्याखाली ३ विशेष पथके दिनांक १७.०६.२०१७ ते २०.०६.२०१७ या कालावधीत तालुक्यामध्ये पाठविण्यात आली व वीज वितरण व्यवस्था पूर्ववत करण्यात आली.

खंडीत वीज वितरणाची परिस्थिती ही नैसर्गिक आपत्तीमुळे घडली असल्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील पायाभूत आराखडा टप्पा दोन मधील कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(११) * ९०८२४ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील महावितरणच्या पायाभूत आराखडा टप्पा दोन मधील कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याने पुणे जिल्हयाचे पालकमंत्री तथा जिल्हा विद्युत वितरण संनियंत्रण समितीचे अध्यक्ष यांनी दिनांक २५ मे, २०१७ रोजी संबधित कामाचा दर्जा तपासण्याचे आदेश वीज वितरण कंपनीला समितीच्या बैठकीत दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामांचा दर्जा तपासण्यासाठी वीज वितरण कंपनीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप उक्त कामांचा दर्जा तपासण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) लोकप्रतिनिधीमार्फत प्राप्त झालेल्या भोसरी विभागीय कार्यालयांतर्गत तक्रारीबाबत, पायाभूत विकास आराखडा कार्यालय, पुणे यांचे मार्फत मा.सदस्य, जिल्हा विद्युत वितरण सनियंत्रण समिती यांचे समक्ष कामाची तपासणी करण्यात आली. तसेच मुख्य अभियंता (गुणवत्ता नियंत्रण)यांचे कार्यालयामार्फत पुणे परिमंडळातील इतर विभागीय कार्यालयामध्ये पायाभूत विकास आराखडा अंतर्गत झालेल्या कामांची नमुना तपासणी सुरु आहे.

-----------------

## सातारा जिल्हयातील कृषीपंपाच्या वीज जोडणीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१२) * ९०६९५ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये कृषिपंप विद्युत जोडणीसाठी सुमारे १४ हजार ६३६ शेतक-यांनी अर्ज केले असून यामधील ८ हजार ९६२ कृषीपंपाची वीज जोडणीची प्रकरणे अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांनी वीज जोडणीसाठी अनामत रक्कम भरुनही वीज जोडणी न देण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) तसेच उक्त प्रकरणी पाणी उपलब्ध असतानाही वीजजोडणी न झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांची पिके सुकून गेली असल्याचे निदर्शनास आले असून प्रश्न भाग १ मध्ये नमूद शेतक-यांची प्रलंबित असलेली वीज जोडणी तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सातारा जिल्हयामध्ये मार्च, २०१७ अखेर १०६३० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(२) व (३) सातारा जिल्हयामध्ये सन २०१७-१८ मध्ये विविध योजनांतर्गत (जिल्हा वार्षिक योजना, पायाभूत आराखडा-२ व इतर) मे, २०१७ अखेर १०२२ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले व मे, २०१७ अखेर १०९१२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित असून त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर जिल्हयामध्ये सन २०१६-१७ करिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत १३७ कृषीपंपांची तरतूद होती. त्यापैकी मे, २०१७ पर्यंत ८१ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, सन २०१७-१८ करिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत २०० कृषीपंपांची तरतूद करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यातील सदोष वीज मीटर त्वरीत बदलण्याबाबत

**(१३) * ८५६३६ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे**

**(जुन्नर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरण कंपनीने बसविलेले रोलेक्स मीटर्स प्रा.लि. कंपनीचे मीटर्स सदोष असल्याचे आढळून आल्याने सदर कंपनीचे वीज मीटर तातडीने बदलण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीकडून खरेदी केलेल्या १० लाख मीटर्सपैकी ३,०२,३३० मीटर्स सदोष असल्याने शहरी व ग्रामीण भागात आतापर्यंत किती मीटर्स बदलण्यात आले आहेत, तसेच उर्वरीत सदोष मीटर्स किती कालावधीत बदलण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, तसेच त्यानुसार महावितरणाच्या आर्थिक नुकसानीसह जबाबदार असणा-या कंपनीवर कोणती दंडात्मक कारवाई केली, तसेच या सदोष वीज मीटरमुळे ग्राहकांवर विद्युत बिलाचा जादा भार पडू नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मे. रोलेक्स कंपनीचे मीटर्स सदोष आढळल्यामुळे जानेवारी, २०१६ पासून सदोष मीटर्स बदलण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) मे. रोलेक्स कंपनीने पुरवठा केलेल्या ३,०२,३३० सदोष मीटर्सपैकी २,९२,३७५ मीटर्स बदलण्यात आलेले आहेत व उर्वरित सदोष मीटर्स व नव्याने आढळून आलेले सदोष मीटर्स तातडीने बदलण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) मे. रोलेक्स मीटर्स प्रा. लि. यांनी सदोष मीटर्स पुरवठा केल्याचे चौकशीअंती आढळून आल्याने सदर कंपनीस दिनांक २१.०३.२०१७ च्या पत्रान्वये काळया यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच महावितरणला झालेल्या आर्थिक नुकसान भरपाईबाबत महावितरणकडे जमा असलेल्या रु. २९ कोटीच्या बँक ठेवी मोडीत काढण्यासाठी बँकेस कळविण्यात आले. प्रत्युत्तरात मे. रोलेक्स यांनी सिकंदराबाद न्यायालयात बँकठेवी मोडीत न काढण्याबाबत खटला दाखल केला असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मितीमधील कंत्राटी कामगारांना वेतन मिळाले नसल्याबाबत

**(१४) * ८७३०३ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तीनही वीज कंपन्यांतील ३२ हजार कंत्राटी वीज कामगारांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी दिनांक २२ मे, २०१७ रोजीपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामगारांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) तसेच कोल्हापूर जिल्हयातील जवळपास ४०० कंत्राटी कामगारांना गेल्या दहा महिन्यापांसून वेतन मिळालेले नसल्याने त्यांनी बेमुदत उपोषण सुरु केले असून या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन मिळावे व इतर प्राथमिक सुविधा मिळाव्यात अशी मागणी करुनही मुख्य अभियंता, कोल्हापूर विभाग यांनी अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(४) तसेच राज्यातील कंत्राटी वीज कामगारांना सेवेत कायम करण्यासाठी नेमलेल्या मनोज रानडे समितीने आपला अहवाल राज्य शासनाला दोन वर्षापूर्वीच सादर केला असून सदर अहवालातील शिफारशींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबधित ठेकेदारावंर कोणती कारवाई केली, तसेच सदर कामगारांना तातडीने वेतन व प्राथमिक सुविधा देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तिन्ही कंपन्यांमधील कंत्राटी कामगारांना कायम करणे, रोजंदारी कामगार पद्धतीद्वारे कामावर घेणे, शाश्वत रोजगाराची हमी, समान काम समान वेतन,

ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे, आदेशांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारांवर कारवाई करणे, इ. स्वरुपाच्या मागण्या आहेत. सदर मागण्या कंपन्यांच्या अखत्यारीतील आहेत त्यावर कंपनी कायद्यानुसार निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) ज्या कंत्राटदारांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केलेले नाही त्याचा ठेका रद्द करुन नवीन कंत्राटदारामार्फत ठेका देऊन माहे जून, २०१७ पर्यंतचे वेतन देण्याबाबत कार्यवाही महावितरण कंपनीकडून करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील ११२६ आश्रमशाळांमधील स्त्री अधिक्षकांची व गृहपालांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१५) * ८५१०३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११२६ आश्रमशाळांमधील स्त्री अधिक्षकांची व गृहपालांची पदे रिक्त असल्याने आश्रमशाळेतील विद्यार्थीनींचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याची बाब दिनांक १५ मे २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) तसेच पाळा आश्रमशाळेतील अत्याचारासारखी प्रकरणांची पुनरावृत्ती होऊ नये या करिता राज्यातील ११२६ आश्रमशाळेतील स्त्री अधिक्षकांची व गृहपालाची रिक्त पदे त्वरित भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील स्त्री अधिक्षक संवर्गातील १०९८ मंजूर पदांपैकी ४१० पदे रिक्त आहेत.

तसेच गृहपाल (स्त्री) संवर्गातील २१७ मंजूर पदांपैकी ६२ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) शासकीय आश्रमशाळेतील स्त्री अधिक्षक संवर्गातील २६२ रिक्त पदांपैकी १८८ पदे व गृहपाल (स्त्री) संवर्गातील १८ पदे सरळसेवेने भरण्यासाठी दि.०७/०७/२०१७ रोजी परिक्षा घेण्यात आलेली आहे.

तसेच अनुदानित आश्रमशाळेतील स्त्री अधिक्षक संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्हयातील नांदगाव पेठ एम.आय.डी.सी. साठी जमिन संपादित केलेल्या प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१६) * ८८०५८ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील नांदगाव पेठ एम.आय.डी.सी. करीता १२ गावांतील १३०० पेक्षा जास्त शेतक-यांची जमिन संपादित केली असून प्रकल्पग्रस्तांच्या कुटूंबातील किमान एका व्यक्तीस पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन दिनांक ३० एप्रिल, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार औद्योगिक उपक्रमामध्ये आस्थापना व पर्यवेक्षकीय श्रेणीत स्थानिक ८० टक्के लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणे बंधनकारक असतानाही प्रकल्पग्रस्ताना रोजगार मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार येथील भूसंपादित प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या कुटूंबातील किमान एका व्यक्तीस रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) अशा प्रकारचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) औद्योगिक विकासातून होणाऱ्या आर्थिक फायद्यांमध्ये स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याबाबत सन १९६८ पासून राज्य शासनाने अवलंबिलेल्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत दि. १७ नोव्हेंबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये सुधारित कार्यपध्दती जाहिर करण्यात आली असून त्यानुसार सर्व औद्योगिक उपक्रमांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व पर्यवेक्षकीय श्रेणीसह इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

अति.अमरावती (नांदगाव पेठ) औद्योगिक क्षेत्रातील विशाल प्रकल्पांमध्ये एकुण २८५ प्रकल्पग्रस्तांची यादी मे. इंडीयाबुल्स पॉवर लि. या कंपनीस प्रादेशिक कार्यालयाकडून पाठविण्यात आली होती. त्यापैकी १९६ प्रकल्पग्रस्तांना कंपनीने नौकरीत सामावून घेण्यात आले आहे. त्यापैकी १८ प्रकल्पग्रस्तांना कागदपत्रांच्या त्रुटीच्या पुर्ततेसाठी कंपनीने कळविले आहे. उर्वरित प्रकल्पग्रस्तांनी कंपनीकडे किंवा प्रादेशिक कार्यालयाकडे संपर्क साधलेला नाही.

स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी रितसर अर्ज केल्यास औद्योगिक क्षेत्रातील कंपनीमध्ये रोजगार मिळण्याच्या अनुषंगाने महामंडळातर्फे शिफारस करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात सुमारे २७ लाख शेतकरी संस्थात्मक कर्जपुरवठ्याच्या व्यवस्थेबाहेर असलेबाबत

**(१७) * ९०१५४ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे २७ लाख शेतकरी संस्थात्मक कर्जपुरवठ्याच्या व्यवस्थेबाहेर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सदर बाबीचा अभ्यास करण्यासाठी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान एक उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत व त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे. राज्यातील एकूण शेतकऱ्यांपैकी किमान ८०% शेतकरी कर्ज पुरवठ्याच्या व्यवस्थेमध्ये आणण्यासाठी सुमारे २६.५८ लाख शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा व्यवस्थेमध्ये नव्याने समाविष्ट करणे गरजेचे आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत

**(१८) * ८४९०० श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.प्रदीप नाईक (किनवट), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी आपल्या कर्जमाफीकरिता दिनांक १ जून, २०१७ पासून बेमूदत संप केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ५ जून, २०१७ रोजी शेतकऱ्यांच्या बेमुदत संपामुळे भाज्या, दूध, फळे महाग होऊन तुटवडा निर्माण झाल्याने राज्यातील जनतेला त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील अल्पभुधारक शेतकऱ्यांना दिनांक २ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाने कर्जमाफी करण्याच्या घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने खरीप हंगामासाठी नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी पैसा उपलब्ध नसल्याने राज्यातील १६ जिल्हा सहकारी बँकानी नकार दिला आहे,हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी १०,००० अग्रिम कर्ज देण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर त्याबाबतचा आदेश काढताना त्यामध्ये अनेक कठोर निकष ठेवण्यात आल्याने कर्जमाफीतून ५० टक्के शेतकरी वगळण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी अशी राज्यातील शेतकऱ्यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त निर्णयांची अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :**(१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) नाही.

(५) अंशत: खरे आहे.

(६) i) शासनाने दि.१४ जून, २०१७ चा शासन निर्णय, दि.२० जून, २०१७ व १ जुलै, २०१७ च्या शासन शुध्दिपत्रान्वये दि.०१/०४/२०१२ रोजी व त्यानंतर पीक कर्ज व मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या व अशा कर्जापैकी दि.३० जून, २०१६ रोजी थकबाकीदार असलेल्या शेतकऱ्यांना खरीप पीकांसाठी निविष्ठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रू.१०,०००/- च्या मर्यादेपर्यंत तातडीने कर्ज देण्याचे निर्देश सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच व्यापारी बँकांना देण्यात आलेले आहेत. त्यासाठी शासन हमी देखील देण्यात आली आहे. कमकुवत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सदर अग्रीम कर्ज देण्याबाबत निधी पुरवण्यासंदर्भात राज्य सहकारी बँकेने ४ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना रू.२५८ कोटींची मंजूरी कळविली आहे.

ii) या योजनेच्या सुलभ अंमलबजावणीसाठी शासनाने हेल्पलाईन सुरू करुन संपर्क साधणाऱ्या व्यक्तींना मार्गदर्शन करण्यासाठी समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती केलेली आहे.

iii) शासनाने दि.२८/०६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ जाहीर केली आहे.

-----------------

## कराड तालुक्यात वीज वितरण कंपनीच्या गैरकारभारामुळे शेतकऱ्यांचा झालेला मृत्यू

**(१९) * ९००३५ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाठार (ता. कराड) येथील माळ शिवारामध्ये दिनांक ९ मे २०१७ रोजी वीज वाहक तारा तुटून ७० वर्षीय शेतकरी बाजीराव दाजी पाटील यांचा मुत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कराड तालुक्यात वीज वितरण कंपनीच्या बेजबाबदार कारभारामुळे गेल्या दीड वर्षामध्ये वीज वाहक तारा तुटल्यामुळे वीजेचा धक्का लागून तीन व्यक्तींचा मुत्यु झाला आहे, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू मृत शेतकरी कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) कराड तालुका अंतर्गत महावितरण कंपनीच्या वीज वाहक तारा तुटल्यामुळे पुढीलप्रमाणे प्राणांतिक अपघात झाले.

(अ) दि. ०९.०५.२०१७ रोजी वाठार, ता. कराड, जि. सातारा येथे श्री. बाजीराव श्रीपती पाटील यांना झालेल्या प्राणांतिक अपघातात महावितरण कंपनीने अपघातग्रस्ताच्या वारसास तातडीची मदत रक्कम रु. २०,०००/- रोख देण्यात आली असून उर्वरित नुकसान भरपाई रक्कम देण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(ब) दि. ०१.११.२०१६ रोजी वडगाव हवेली, ता. कराड, जि. सातारा येथे श्री. कांतीलाल बाबुराव मुळे यांना झालेल्या प्राणांतिक अपघातात महावितरण कंपनीने अपघातग्रस्ताच्या वारसास तातडीची मदत रक्कम रु. २०,०००/-रोख व रु. ३,८०,०००/- आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(क) दि. ०१.११.२०१६ रोजी वडगाव हवेली, ता. कराड, जि. सातारा येथे कु. अक्षय सुरेश मुळीक यांस झालेल्या प्राणांतिक अपघातात महावितरण कंपनीने अपघातग्रस्ताच्या वारसास तातडीची मदत रक्कम रु. २०,०००/-रोख व रु. ३,८०,०००/- आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(४) कै. अक्षय सुरेश मुळीक यास झालेल्या प्राणांतिक अपघातास जबाबदार असणाऱ्या संबंधित शाखेच्या वरिष्ठ तंत्रज्ञावर महावितरण कंपनीकडून आरोपपत्र बजावून शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

-----------------

**परळी (जि.औरंगाबाद) येथील क्र. ४ व ५ हे संच बंद असून संच क्र. ८ मध्येही अनेक समस्या असल्याबाबत**

**(२०) * ९१११२ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला सद्य:स्थितीमध्ये ४ हजार मेगावॅट विजेचा तुटवडा भासत असून त्यातच औरंगाबाद जिल्हयातील परळी येथील क्र. ४ व ५ हे संच बंद असून १००० कोटी रु. खर्च करुन नवीन बनवलेल्या संच क्र. ८ मध्ये बॉयलर ट्युबला लागलेली गळती, कोळसा वाहून नेणा-या पट्ट्यात झालेला बिघाड इ. समस्या असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच परळीतील औष्णिक विद्युत केंद ३७ वर्षापेक्षा अधिक जुने झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संच क्र. ८ मध्ये असलेल्या समस्यांबाबत जबाबदार असणा-यांवर शासनाने कोणाती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच नादुरुस्त असलेले संच तातडीने दुरुस्त करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) परळी औष्णिक विद्युत केंद्रातील संच बंद असल्याची कारणे खालील प्रमाणे आहेत:-

अ) संच क्र. ४ व ५ (प्रत्येकी २१० मे.वॅ.) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार दि. ०१.०४.२०१६ पासून बंद ठेवण्यात आले आहेत.

ब) संच क्र. ८ मे. भेल कंपनीकडून ट्रायल रन दि. १७.०३.२०१७ पासून सुरु होती. वेळोवेळी येणाऱ्या सुरक्षा प्रणाली व इतर समस्यांचे निराकरण करुन सदर संच क्र. ८ सुरळीतपणे सुरु करण्यात आले होते. परंतु सध्या MOD प्रणालीनुसार महावितरण कडून वीजेच्या मागणी अभावी तो दिनांक १७.०६.२०१७ पासून बंद ठेवण्यात आला आहे.

तथापि, सद्यस्थितीत राज्यात वीजेचा तुटवडा नाही.

(२) परळी औ.वि. केंद्रातील सर्वात जास्त जुना संच क्र. ४ असून त्याचे वयोमान ३२ वर्ष आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोवंडी (मुंबई) येथील रिलायन्स एनर्जीच्या सब स्टेशनमध्ये झालेला स्फोट**

**(२१) * ८९४४७ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला वीजपुरवठा करणा-या रिलायन्स एनर्जीच्या गोवंडी येथील सब स्टेशनमध्ये उपकरणात तेल टाकताना झालेल्या स्फोटात तीन कामगारांचा जागीच मृत्यू झाला व एक कामगार जखमी अवस्थेत असून उपचार घेत असल्याची घटना दि. २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अद्याप कोणतीच तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आलेली नाही परंतु पोलीसांनी रिलायन्सच्या संबंधित अधिका-यांकडे तसेच इलेक्ट्रीक अभियंता आदींकडून याबाबत अहवाल मागवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही घटना कंपनीतील अधिका-यांच्या बेजबाबदारपणामुळे घडल्याचा आरोप कामगार करत असून मृत कर्मचा-यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याची मागणी करुन दोषींवर कारवाईची मागणीही कामगार संघटनांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित कंपनीने अहवाल सादर केला आहे काय, त्यानूसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे तसेच मृत कर्मचा-यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दि. ८ एप्रिल, २०१७ रोजी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. च्या देवजी केशवजी इंडस्ट्रिअल इस्टेट उपकेंद्र, गोवंडी येथील ऑईलफिल्ड स्विचगीअरच्या नियतकालीक तपासणीच्या वेळी तांत्रिक दोष निर्माण होऊन फ्लॅश ओव्हर (आगीचा भडका) झाल्या कारणाने एक व्यवस्थापक व तीन कामागार जखमी होऊन तद्नंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला आहे.
(२) गोवंडी पोलिस ठाण्याकडून रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविण्यात आला हे खरे आहे.
(३) व (४) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनीने गोवंडी पोलिस ठाण्याला अहवाल सादर केलेला आहे. या संदर्भात विद्युत निरीक्षक, सांताक्रुझ निरीक्षण विभागाकडून अपघाताच्या घटनास्थळी भेट देऊन चौकशी केल्यानंतर, सदर अपघात ऑईल फिल्ड स्विचगिअर मधील तांत्रिक दोषामुळे झालेला असल्यामुळे, त्यास वैयक्तिकरीत्या कोणीही जबाबदार नाही, असा अहवाल दिला आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनीने मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना एकूण रु. २.४४ कोटी इतकी नुकसान भरपाई दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर व मोखाडा (जि.ठाणे) तालुक्याच्या सिमेवरील कारेगाव येथील आश्रमशाळेची झालेली दुरावस्था

**(२२) * ८७६२१ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील शहापूर व मोखाडा तालुक्याच्या सीमेवरील कारेगाव येथील आश्रमशाळेची मोठया प्रमाणात दुरावस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर आश्रमशाळेत अधिक्षक (स्त्री/पुरुष) पदे चार वर्षांपासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर आदिवासी आश्रमशाळेची दुरुस्ती करणेबाबत तसेच स्त्री-पुरुष अधिक्षकांची पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

शासकीय आश्रमशाळा कारेगांव, ता. मोखाडा, जि. पालघर येथे पुरुष अधिक्षक पद हे दिनांक. ३०/०६/२०१२ पासून रिक्त असून स्त्री अधिक्षिका हे पद दि.२०/०५/२०१३ पासून रिक्त आहे.

(३) १) प्रकल्प कार्यालय जव्हार अंतर्गत कार्यालयीन कर्मचा-यांना प्रत्येकी ०१ आश्रमशाळा दत्तक स्वरुपात देण्यात आलेली आहे. दिर्घकालीन उन्हाळयाच्या सुटटीमध्ये शासकीय आश्रमशाळा कारेगांव, ता. मोखाडा, जि. पालघर या आश्रमशाळेमध्ये किरकोळ दुरुस्ती कामे शालेय व्यवस्थापन समिती (SMC) अंतर्गत मुख्याध्यापक यांचेमार्फत शालेय स्तरावर करण्यात आलेली आहे.

२) शासकीय आश्रमशाळा कारेगांव, ता. मोखाडा, जि. पालघर येथे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर पुरुष अधिक्षक व स्त्री अधिक्षिकांची पदे भरण्यात आलेली आहेत. सदरची पदे कायमस्वरूपी भरणेबाबत अपर आयुक्त, ठाणे यांनी शासनमान्यतेनूसार दि.३/४/२०१७ रोजी अधिक्षक (पुरूष/महिला), गृहपाल (पुरूष/महिला) या सरळसेवा कोट्यातील अधिक्षक पुरूष- ३०, अधिक्षक महिला- ६०, गृहपाल पुरूष ६ व गृहपाल महिला-५ या रिक्त पदांसाठी जाहिरात प्रसिध्द केली असून आयुक्त, आदवासी विकास, नाशिक यांनी सदर पदे भरती प्रक्रिया महाऑनलाईन, मुंबई या संस्थेमार्फत पूर्ण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने कोराडी येथील निकामी झालेले ४६५ मेगावॅट क्षमतेचे चार संच विकल्याबाबत**

**(२३) * ८५४९१ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने (महाजनको) कोराडीतील निकामी झालेले ४६५ मेगावॅट क्षमतेचे चार संच केवळ ६०.६० कोटी रुपयात नागपूरच्या सनविजय रिरोलींग इंजिनिअरिंग वर्क्सला विकल्याचे दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संचाची आजची किंमत २५० कोटी असंतानाही फक्त नागपूरच्याच धनविजय रिरोलिंग इंजिनिअरिंग वर्क्स या कंपनीला काम मिळण्यासाठी महाजनकोच्या अधिका-यांनी निविदा प्रकियेच्या अटी व शर्तीमध्ये बदल केले, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, एमएसटीसीमार्फत सदर लिलाव करताना घातलेल्या जाचक अटींमुळे जास्त कंपन्या त्यामध्ये सहभागी होऊ शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संचाच्या लिलावाकरीता अधिका-यांनी नियमात बदल करुन आर्थिक हित साधण्याकरिता कमी किंमतीत चारही संचाची विक्री करून कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार केला असून अशाप्रकारे कमी किमतीत सदर संचांची विक्री करणा-या अधिका-यांची शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महानिर्मिती कंपनीने कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील निकामी झालेले (४X१२०/१०५) मेगावॅट क्षमतेचे चार संच विक्री करण्यासाठी ई-लिलाव प्रक्रिया राबविलेली असून सदर लिलाव प्रक्रियेमध्ये मे. सनविजय रिरोलींग इंजिनिअरिंग वर्क्सच्या कमाल बोली नुसार मूळ किंमत रु. ६०.६० कोटी, मूल्यावर्धित कर (VAT) १३.५% अतिरिक्त व इतर कर रु. ११.८७ कोटी अशी एकूण रु. ७२.४७ कोटी विक्रीची रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

(२) सदर संच सुमारे ४५ वर्षापेक्षा जास्त जुने असल्याने व त्यातील तंत्रज्ञान कालबाहय झाले असल्यामुळे हया संचांचा नविन ठिकाणी पुर्नवापर करणे आर्थिकदृष्टया योग्य नसल्याने त्यांच्या विक्रीसाठी भंगारभाव योग्य असल्याचे मूल्यांकनकार (Valuers) ने नमूद केले व तसाच सल्ला मे. एम.एस.टी.सी. यांनीही दिला होता. त्यानुसार लिलावासाठी रु. ७० कोटी हे मूल्य ठरवण्यात आले. तसेच मे. एम.एस.टी.सी. यांचे पूर्वानुभव व सल्ल्यानुसार महानिर्मितीच्या इतर केंद्रात जुने संच भंगारात काढण्याचा व सक्षम बोलीदार न मिळाल्याने पूर्वानुभव लक्षात घेऊन अटी व शर्तीमध्ये बदल करण्यात आले जेणेकरुन निकामी झालेल्या संचांची खरेदी सक्षम खरेदीधारकाकडून होऊ शकेल.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुडाळ तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) नेरुर गोंधयाळेवाडीत कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याबाबत

**(२४) * ८५००८ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) नेरुर गोंधयाळेवाडीत सुमारे चार वर्षांपासून कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने याबाबत ग्रामस्थांनी महावितरणच्या अधिका-यांकडे वारंवार तक्रारी करुनही कार्यवाही होत नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी ग्रामस्थांनी कुडाळ येथील वीज वितरण विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयासमोर माहे मे, २०१७ मध्ये बेमुदत उपोषण सुरु केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नेरुर गोंधयाळेवाडीत गेल्या चार वर्षापासून कमी दाबाने विद्युत पुरवठा करण्याची कारणे काय आहेत व ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण करण्यापूर्वी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) याबाबतची तक्रार महावितरण कंपनीस प्राप्त झाली होती.

(२) दि. १२.०५.२०१७ रोजी नेरुर गोंधयाळे वाडीतील ग्रामस्थांनी सदर प्रश्नाबाबत उपोषण सुरु केले होते. तथापि, ग्रामस्थांसमवेत चर्चा होऊन कमी दाबाने होणाऱ्या वीज पुरवठयाची समस्या दूर करण्यासाठी जुना प्रस्ताव सुधारित करण्याची मागणी मान्य करण्यात आल्याने ग्रामस्थांनी उपोषण मागे घेतले.

(३) व (४) मौजे नेरुर गोंधयाळेवाडी येथे परब पाइप फॅक्टरी पिंगुळी येथील रोहित्रावरुन वीज पुरवठा सुरु आहे. सदरची वाडी व रोहित्र यांमधील अंतर अंदाजे ४५ पोल एवढे असल्याने कमी दाबाने वीज पुरवठा होतो. वीज पुरवठा सुरळीत दाबाने होण्यासाठी विद्युत वाहिन्यांची आवश्यक ती देखभाल व दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

तसेच उपोषणावेळी झालेल्या चर्चेनुसार नवीन रोहित्र बसविण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, सिंधुदुर्ग यांना दि. ०३.०६.२०१७ रोजी मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

-----------------

**राज्यातील आश्रमशाळांची दुरावस्था व विद्यार्थ्यांच्या होणारे मृत्युबाबत**

**(२५) * ८५५६४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राहूल कुल**

**(दौंड), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा. उच्च न्यायालयाने आदिवासी शाळांची दुरावस्था दूर करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांचे होणारे मृत्यु रोखण्याबाबत माहे जून, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात शासनास सूचना केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील आश्रमशाळांतील विदयार्थ्यांच्या मृत्यूच्या प्रमाणात वाढ होत असल्याने त्यांची कारणमीमांसा आणि उपाययोजना करण्यासाठी दिनांक ३० मे, २०१६ रोजी डॉ.साळुंके यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञांची समिती नेमण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समितीने राज्यभरातील १९ आश्रमशाळांना भेटी दिल्या असून समितीच्या अहवालानूसार १०९९ विद्यार्थ्यांचा विविध कारणांमुळे मृत्यू झाला असून त्यात सर्पदंश, पोटदूखी, ताप, अपघात, आत्महत्या आदी कारणांचा समावेश असल्याचा निष्कर्ष समितीने काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच तळोदा (जि.नंदूरबार) येथे १६६, धारणी (जि.अमरावती) येथे ७१, कळवण (जि.नाशिक) येथे ७० तर डहाणू येथे ५१ बालमृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सोयी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी व सकस आहार, राहण्याची उत्तम सोय, आरोग्य तपासणी इत्यादीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी Cr. PIL ६९/२०१६ श्री. रविंद्र तळपे वि. महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणी दि. १२.०६.२०१७ रोजी पार पडलेल्या

सुनावणी दरम्यान शासनाने दि. ३० मे २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या डॉ. साळुंखे, सेवानिवृत्त महासंचालक, आरोग्य यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय समितीने केलेल्या शिफारशी व कार्यवाहीबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

समितीच्या अहवालानूसार मागील १५ वर्षात विविध कारणांनी १०७७ विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्याची बाब आढळुन आली आहे.

(४) हे खरे आहे.

(५) डॉ. साळुंखे समितीने सदर अहवालात १८ अल्पकालीन व ९ दिर्घकालीन अशा एकुण २७ शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी जिल्हाधिकारी स्तरावर आढावा गटाची स्थापना, वैद्यकिय सामाजिक विश्लेषण समिती आढावा पथकाची स्थापना, जिल्हाधिकारी स्तरावर विद्यार्थी मृत्यू त्रैमासिक आढावा समिति स्थापना, जेवणाच्या वेळेत बदल, पालकांचे संमतीपत्र, वैद्यकिय सेवेविषयी फलक लावणे, किमान क्रिडा सुविधा, मादक पदार्थ सेवन मनाई, तातडीने वैद्यकिय निधी देखभाल दुरूस्ती इत्यादी बाबत कार्यवाही करण्यात आली असून उर्वरीत शिफारशींची कारवाई सुरू आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील बाजार समित्यांमार्फत शेतकऱ्यांकडून तूर खरेदी करताना आलेल्या समस्यांबाबत

**(२६) * ८४८९९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे**

**(आर्वी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने नाफेडमार्फत खरेदी केंद्रांच्या माध्यमातून सुमारे ४ लाख टन तुर खरेदी केली असली तरी याच काळात शेतक-यांनी कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये त्यापेक्षा अधिक म्हणजे सुमारे ४ लाख ९० हजार टन तुर विक्री केली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांच्या सातबारावरील पिक नोंदीत तुरीची नोंद आहे त्यांच्याकडूनच तुर खरेदी करणे तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी पंचनामे केल्याखेरीज बाजारसमितीतील तुरीची खरेदी केली जाणार नाही, अशा दोन अटी शासनाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये घातल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अटीमुळे शेतकऱ्यांची खरेदी केंद्रावर लाखो क्विंटल तुर खरेदीविना पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यात नाफेडमार्फत खरेदी करण्यात आलेल्या तुरीपैकी निम्मी तुर ही व्यापाऱ्यांची असून ती कमी भावाने शेतकऱ्यांकडून घेऊन अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रूपये कमावल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील तूरीच्या विक्रमी उत्पादनामुळे शेतक-यांची तूर खरेदी करण्यासाठी नाफेडने सूरू केलेली खरेदी केंद्रे दिनांक २२ एप्रिल, २०१७ रोजीपासून बंद केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) केंद्रशासनाच्या किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत दिनांक २२/४/२०१७ या वाढीव कालमर्यादेपर्यंत तूर खरेदी झाल्यानंतरही दिनांक २२/४/२०१७ रोजी खरेदी केंद्रावर खरेदी विना शिल्लक असलेल्या जवळपास १० लाख क्विंटल तूरीची खरेदी करण्यासाठी राज्य शासनाने अटी घातलेल्या होत्या.फक्त शेतकऱ्यांची तूर खरेदी करावी हा त्यामागील महत्वाचा उद्देश होता.

(३) नाही.

दिनांक २७/४/२०१७ पासून राज्य शासनाच्या बाजार हस्तक्षेप योजनेतर्गत खरेदी केंद्रावरील तूरीची खरेदी सुरु करण्यात आली होती.

(४) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, चौकशी करण्यात येत आहे.

(५) व (६) हे खरे नाही.

केंद्रशासनाच्या किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत तूर खरेदीचा कालावधी सुरुवातीस दिनांक १५/१२/२०१६ ते दिनाक १५/३/२०१७ इतका होता. तथपि राज्य शासनाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सदर कालावधी प्रथमत: दिनांक १५/४/२०१७ व तद्नंतर दिनांक २२/४/२०१७ पर्यंत वाढविण्यात आला होता. तद्नंतर राज्यशासनाने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने केंद्रशासनाने Price Support Scheme अंतर्गत प्रथम १० लाख क्विंटल व तद्नंतर १.५ लाख क्विंटल तूर खरेदी करण्यास परवानगी दिली होती.

हंगाम २०१६-१७ मध्ये झालेली तुरीची खरेदी पुढीलप्रमाणे:-

| | | |
|---|---|---|
| PSF (किंमत स्थिरता निधी) | १५/१२/२०१६ ते २२/४/२०१७ | ४०१९०३९.६२ |
| PSS (Price Support scheme) | ९/५/२०१७ ते २६/५/२०१७ | १०,००,००० |
| | ६/६/२०१७ ८/६/२०१७ | १५०,०००,०० |
| MIS (बाजार हस्तक्षेप योजना) | २७/४/२०१७ ते ८/६/२०१७ | ७०२३६५.२६ |
| | २७/४/२०१७ ते ५/६/२०१७ | ६२१५३३.१३ |
| | ९/५/२०१७ ते १२/६/२०१७ | २१४७९७.४९ |
| | | **६७३४७५५.५०** |

-----------------

**टेमघर (जि.रायगड) येथील महाड औद्योगिक वसाहतीमधील गोदामात लागलेल्या आगीबाबत**

**(२७) * ८८२३१ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेमघर (जि.रायगड) येथील महाड औद्योगिक वसाहतीमधील भंगार गोदामाला दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास आग लागली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड औद्योगिक वसाहतीमध्ये कारखान्यामधून मोठ्या प्रमाणात प्लास्टीक व लोखंडी ड्रममधून वेस्ट सॉल्वंट भंगारवाल्याना देतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंगार व्यावसायिक कारखान्यातून उचललेले सॉल्वंट (रासायनिक पदार्थ) अनधिकृतरित्या गोदामात साठवून ठेवतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तेथे असलेल्या भंगार गोदामाला यापूर्वी अनेक वेळा आग लागण्याचे प्रकार घडूनही संबंधितांवर विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या गंभीर प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
अशा प्रकारची बाब तपासात आढळून आलेली नाही.
(४) हे खरे नाही.
आग लागण्याची घटना पुर्वी घडलेली नाही.
(५) आग ही अज्ञात कारणामुळे लागल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील आरमोर्स टाऊन शिपमध्ये विजेच्या धक्क्याने मुलाचा झालेला मृत्यू

**(२८) * ८५४८७ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील आरमोर्स टाऊनशिपमध्ये विजेच्या उच्च दाब तारेचा शॉक लागून जखमी झालेल्या दोन जुळया भावंडांपैकी ११ वर्षीय प्रियांश धर या मुलाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची बाब दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टाऊनशिप बांधणारे विकासक व महावितरण यांच्या अक्षम्य चुकीमुळे सदर अपघात घडला असूनही या दोघांविरोधात कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या टाऊनशिप मधील घरांना चिकटून असलेल्या उच्च दाब वीज वाहिन्या हटविण्यासाठी नागरिकांनी अनेक वेळा संबंधित विकासकाकडे व महावितरणकडे पाठपुरावा करुनही सदर धोकादायक उच्चदाब तारा हटवल्या गेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अपघातास जबाबदार असलेल्या महावितरणच्या संबंधित अधिकारी व विकासकाविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दि. ३१/०५/२०१७ रोजी नागपूर शहरातील आरमोर्स टाऊनशिपमध्ये वीजेच्या ३३ के.व्ही उच्च तारेच्या संपर्कात येऊन झालेल्या अपघातात चि. प्रियांश संजय धर यांचा दि. ०९/०६/२०१७ रोजी व चि. पियुश संजय धर यांचा दि. २०/०६/२०१७ रोजी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.
(२) सदर अपघाताची विद्युत निरीक्षक, नागपूर यांच्यामार्फत दि. ०२/०६/२०१७ रोजी चौकशी करण्यात आली असून आरमोर्स टाऊनशिप बांधणारे विकासक श्री. आनंद खोब्रागडे यांना दि. ०३/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे तसेच त्यांच्यावर पोलीस स्टेशन जरीपटका, नागपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक्षक अभियंता महावितरण, नागपूर यांना दि. ०३/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(३) विदयुत निरीक्षक, नागपूर यांनी ३३ के.व्ही. तारा फिडर योग्य क्षमतेच्या केबलव्दारे भूमिगत करण्याबाबत एस. एन. डी. एल., नागपूर या वितरण कंपनीस दि. ०७/०६/२०१७ अन्वये ज्ञापन दिले आहे.
(४) आरमोर्स टाऊनशिप बांधणारे विकासक श्री. आनंद खोब्रागडे यांना दि. ०३/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांना अपघातग्रस्तांच्या वारसास नुकसान भरपाई देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्यावर पोलीस स्टेशन जरीपटका, नागपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच एस. एन. डी. एल. नागपूर या वितरण कंपनीस दि.०३/०६/२०१७ पत्रान्वये अपघातग्रस्तांच्या वारसास नुकसान भरपाई देण्याबाबत सूचित करण्यात आले होते त्यानुसार त्या कंपनीने अपघातग्रस्ताचे वडीलांना रु. ८ लक्ष इतकी नुकसान भरपाई देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या अधिका-यांनी निधी वाटपात गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२९) * ८६६७५ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने आपली भौतिक व आर्थिक उद्दिष्ट्ये पूर्ण न करता केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध योजनेसाठी मिळालेल्या कोट्यावधी रूपयांच्या निधीचे वाटप लाभार्थींना करण्याऐवजी बँकामध्ये मुदत ठेव योजनेत गुंतवणूक करून गरजूंना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवल्याची माहिती महालेखापरीक्षंकानी केलेल्या निरीक्षणात उघड झाली असल्याचे दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी गेल्या पाच वर्षात निधीचे वाटप केलेल्या अनेक प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार आणि अनिमियतता केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची राज्य शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, या प्रकरणी दोषी असलेल्या संबधितावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अमरावती, औरंगाबाद, कराड, नागपूर, नाशिक, पुणे व वाशी परिमंडळात "ईपीसी" कंत्राटाअंतर्गत २६५ रोहित्र (transformer) बदलण्यात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(३०) * ८५०७१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२ ते २०१६ या कालावधीत राज्यातील अमरावती, औरंगाबाद, कराड, नागपूर, नाशिक, पुणे व वाशी परिमंडळात "ईपीसी" कंत्राटातंर्गत २६५ रोहित्र (transformer) बदलण्यात आल्याचे तर अडीच कोटी रूपयांत नविन रोहित्र मिळत असताना सुध्दा नविन खरेदी प्रक्रियेत कालापव्यय होईल असे कारण दर्शवून खराब असलेल्या जुन्याच रोहित्रांमध्ये कोअर आणि वाईंडीग, ऑईल आदी महापारेषणचेच वापरून प्रत्येकी अडीच कोटी रूपये खर्च करून तब्बल ५० जुनेच रोहित्र दुरूस्त करून कोट्यावधी रूपयांचा गैरव्यवहार करण्यात आला असल्याची माहिती दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे उच्चदाब विद्युत रोहित्र क्षमता बदल व दुरुस्ती प्रकरणी सुमारे १२५ कोटीपेक्षाही अधिक रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत शासकीय तांत्रिक लेखापरिक्षकांनी आपल्या अहवालात नमूद केले असल्याचेही यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळले, तसेच नविन रोहित्र अडीच कोटी रूपयात मिळत असून त्याचे आयुष्यमान २५ वर्ष असतानाही जुन्या राहित्रांमध्ये दुरुस्ती करण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच व्यवस्थापकीय संचालकांच्या पुर्व परवानगीशिवाय या जुन्या रोहीत्रांच्या क्षमता वाढीवर खर्च करण्यात आलेला असून संबंधित अधीक्षक अभियंता (अति उच्च दाब संचालन व सुव्यवस्था प्रविभाग) यांनी त्यांच्या अधिकारात सदर

रोहित्रांची खरेदी केली असून त्यानुसार संबंधित सर्व अधीक्षक अभियत्यांविरुध्द कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि मे-जून २०१७ चे दरम्यान महालेखापाल-३, महाराष्ट्र यांनी दोन प्रकरणात प्रक्रियात्मक त्रुटी निदर्शनास आणल्या होत्या. सदर त्रुटींची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी महापारेषण कंपनीच्या मुख्य कार्यालयाव्दारे रोहित्राच्या दुरुस्ती व ओव्हरॉलींग बाबत मार्गदर्शक तत्वे /सूचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. तसेच उपरोक्त त्रुटींबाबत कंपनीतंर्गत तांत्रिक चौकशी सुरु आहे.

(२) विद्युत रोहित्र क्षमता बदल व दुरुस्तीचे प्रकरणी शासकीय लेखापरिक्षकांनी दिलेल्या अहवालाचे तपशीलवार अनुपालन कंपनीकडून सादर करण्यात आले असून त्यामध्ये कसलाही आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येत नाही.

(३) जुनी रोहित्रे दुरुस्त करण्याचे कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१) अति उच्च दाब उपकेंद्रातील रोहित्र नादुरुस्त झाल्यावर लगतच्या परिसरातील विद्युत पुरवठा खंडित व आणीबाणीची परिस्थिती निर्माण होते. कारण अति उच्च दाब रोहित्र मोठया परिसरात विद्युत पुरवठा करीत असतात. यामुळे रेल्वे, दवाखाने, घरगुती, व्यापारी, औद्योगिक व सार्वजनिक पाणी पुरवठा असा मोठा विद्युत वापर करणाऱ्या ग्राहकांवर परिणाम होतो. त्यामुळे नादुरुस्त झालेल्या रोहित्रांच्या जागी उपलब्ध असलेले रोहित्र तातडीने लावणे गरजेचे असते. हया करिता महापारेषणमध्ये काही रोहित्र दुरुस्त करुन उपलब्ध करुन ठेवण्यात येतात.

२) रोहित्र दुरुस्ती केल्यास अल्प काळात विद्युत पुरवठा पूर्व पदावर येतो.

(४) महापारेषणमध्ये नादुरुस्त झालेल्या रोहित्रांची दुरुस्ती ही मंजूर दरसूचीनुसारच करण्यात येते व ही दरसूची खुल्या निविदेव्दारे निश्चित करण्यात येते. तसेच महापारेषण अंतर्गत दुरुस्ती, देखभाल व नविन कामांची प्रशासकीय मान्यता सामान्य आदेश क्र. २ मध्ये प्रदान केलेल्या अधिकाराप्रमाणे करण्यात येते. महापारेषणमध्ये रोहित्रांची खरेदी मध्यवर्ती खरेदी विभागामार्फत ई-

टेंडरव्दारेच करण्यात येते. अधिक्षक अभियंत्यांनी रोहित्रांची खरेदी केली नाही, त्यामुळे त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) अतिदुर्गम भागात वीज पुरवठा अनियमित असल्याबाबत

**(३१) * ८७१२९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) अतिदुर्गम भागात वीज पुरवठा अनियमित असून अनेक ठिकाणी ८ तास वीज खंडित होणे, जीर्ण झालेले वीजेचे खांब न बदलणे, खर्डी गावात झाडांनाच विजेच्या तारा बांधून घरांना वीजजोडण्या देण्यात येणे इ. घटना माहे एप्रिल, २०१७ मध्ये निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खर्डी गावातील ३० हून अधिक खांब पूर्णपणे जीर्ण झाले असून पावसाळयात कधीही कोसळण्याची भिती असल्याने तेथील स्थानिकांनी तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने महावितरणने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) माहे एप्रिल, २०१७ मध्ये वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीकडून पाहणी केली असता खर्डी येथे काही घरांना होणारा वीजपुरवठा पोल पासूनचे अंतर जास्त असल्यामुळे सर्व्हिस वायर लोंबकळत होत्या. सदर ठिकाणी नवीन पोल उभारणी करुन दि. २५.०४.२०१७ रोजी त्याची दुरुस्ती करण्यात आली.वीज पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने वीज वाहिन्यांजवळ असणारी झाडे तोडून वीजपुरवठा नियमित करण्यात आला.

(३) सदर भागातील ५ उच्चदाब व ३२ लघुदाब पोलच्या वाहिनीचे अंदाजपत्रक मंजूर असून सदर कामांचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने ३ उच्चदाब वाहिनीचे पोल व ७ लघुदाब वाहिनीचे पोल बदली करण्यात आलेले आहेत व उर्वरित कामे प्रगती पथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुरबाड (जि.ठाणे) येथील मृण्मयी आश्रमशाळेतील सोयीसुविधांच्या अभावाबाबत**

**(३२) * ८७८११ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथील मृण्मयी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना आश्रमशाळेपासून अर्धा कि.मी. अंतरावर असलेल्या बोअरवेलचे पाणी भरण्याची शिक्षा आश्रमशाळा चालकांनी दिल्याचे दि. ५ एप्रिल, २०१७ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेची दुरावस्था झाली असून दर पावसाळ्यात लागणा-या गळतीमुळे विद्यार्थ्यांना वर्गात बसणे जिकिरीचे होत असून आंघोळ करण्याची सोय नसल्याने मुला-मुलींना नदीवर जाऊन आंघोळ करावी लागत असून याबाबतच्या तक्रारी आश्रम शाळेतील मुलांच्या पालकांनी आश्रमशाळा व्यवस्थापनाकडे वारंवार करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ नुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आश्रमशाळा व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच विद्यार्थ्यांना उक्त सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) हे ही खरे नाही.

मृण्मयी विकास प्रबोधिनी संस्था संचलित अनुदानित आश्रमशाळा तळवली (ता.मुरबाड, जि.ठाणे) या अनुदानित आश्रमशाळेमध्ये वर्गामध्ये मुलांना पाण्यामध्ये बसून शिक्षण घ्यावे लागते, अशी स्थिती नाही. तसेच मुलांसाठी २२

शौचालये व मुलींसाठी ९ शौचालये असून मुलांसाठी ५ स्नानगृहे व मुलींसाठी ७ स्नानगृहे आहेत. तसेच २ बोअरवेल व १ विहिर असून पिण्याच्या पाण्याकरीता सिंटेक्सची १०,००० लिटरची व सिमेंटच्या ५००० लिटरच्या दोन टाक्यांबरोबर वॉटर कुलर व वॉटर प्युरीफायरचा वापर केला जातो. तसेच पोहण्याचे कौशल्य असणारी मोठी मुले हौस म्हणून आश्रमशाळेवजळच्या नदीत पोहण्यासाठी जात असतात त्यावेळी शाळेचे अधीक्षक त्यांच्याबरोबर उपस्थित असतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयातील दिव्यांगांकरिता राखीव असलेला ३ टक्के निधी वापरला नसल्याबाबत**

**(३३) * ८६९४३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील दिव्यांगांकरिता ३ टक्के राखीव निधी त्यांच्यासाठी वापरण्यात आलेला नाही तसेच या इतर मागण्यांसाठी दिव्यांग संघटनेने दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी दिव्यांग संघटनेच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) तसेच दिव्यांगांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अपंग कल्याणार्थ ३ टक्के निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनेचा लाभ लाभार्थ्याचे बँक खात्यात थेट जमा करण्यात यावा, अशा स्वरूपाची मागणी होती.

(३) ग्रामविकास विभागाच्या दि. २४ नोव्हेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांकडून त्यांच्या स्व-उत्पन्नाच्या ३ टक्के निधीतून अपंग व्यक्तींकरिता कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटेमाल धनगरवाडी (ता.सुधागड, जि.रायगड) येथे विद्युत पुरवठा होत नसल्याबाबत

**(३४) * ९११७४ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जांभूळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील घाटेमाल धनगरवाडी (ता.सुधागड, जि.रायगड) येथे स्वातंत्र्याच्या ६७ वर्षानंतरही विद्युत पुरवठा करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी विद्युत पुरवठा सुरु होण्यासाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची शासनस्तरावर पूर्तता होवून माहे मे, २०१७ मध्ये ७ महिने पूर्ण होवूनही सदर गावात अद्यापपर्यंत वीज पुरवठा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, येथे तात्काळ विद्युत पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सुधागड (जि. रायगड) जांभूळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील घाटेमाल धनगरवाडी येथे विद्युत पुरवठा करण्यासाठी लघुदाब वाहिनीचे काम जिल्हा योजनेअंतर्गत दिनांक ३.०५.२०१७ रोजी पूर्ण झाले आहे. घाटेमाल धनगरवाडी येथे दिनांक ०६.०५.२०१७ रोजीपासून वीज पुरवठा करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात अमृत आहार योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३५) * ८८१५६ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुपोषित मुलांच्या संगोपनासाठी सुरु करण्यात आलेली व राज्यातील १६ जिल्ह्यात राबविण्यात येत असलेली भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सरकारी यंत्रणेचा अभाव व अन्नपदार्थ खरेदी करण्यासाठी निधीच नसल्याने राबविण्यात आदिवासी विकास विभागाला अडचणी येत असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच कर्जत तालुक्यातील ४७ गावांमध्ये या वर्षी मे महिन्यात सुरुवात केलेली योजना अवघ्या दोन आठवडयात बंद पडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने योजना सर्व आदिवासी बहुल जिल्हयात सुरु करण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करित आहे, तसेच सदर योजना सक्षमपणे राबविण्यासाठी निधी अपुरा असल्यामुळे निधीचा पुरवठा वाढविण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करित आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रु. १७०.८४ कोटी इतका निधी दि.१८ मे व २० मे, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना वितरित करण्यात आला आहे. सदर योजना अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १६ जिल्हयांमध्ये कार्यरत आहे.

(२) हे खरे नाही.

कर्जत तालुक्यातील ४७ गावांमध्ये असलेली भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना माहे ऑक्टोंबर, २०१६ पासून सुरु असून सद्यस्थितीमध्ये सदर योजना योग्य रित्या राबविण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी समाजातील मुलांना नामांकित इंग्रजी शाळांत प्रवेश देण्याबाबत**

**(३६) * ८५०५२ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी समाजातील मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शासनाने सन २०१५-१६ पासून अनुसूचित जमातीच्या २५००० विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी शाळांमध्ये पहिली ते पाचवी या वर्गात प्रवेश देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याने अन्य विद्यार्थ्यांवर परिणाम होतो असे शाळांचे म्हणणे असल्याने सदर शिक्षण संस्थांच्या दबावामुळे आदिवासी विकास विभागाने आता फक्त पहिली व दुसरीतच प्रवेश देण्याचा निर्णय दिनांक २९ मे, २०१७ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आपलाच निर्णय शासनाने बदलण्याची कारणे काय आहेत, राज्यातील अनुसूचित जमातीचे विद्यार्थी नामांकित इंग्रजी शाळेतून मिळणाऱ्या शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याबाबतची योजना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून राबविण्यात येत असून सन २०१४-१५ पर्यंत योजनेंतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली मध्येच प्रवेश देण्यात येत होता. तद्नंतरच्या दोन वर्षात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना योजनेचा मोठ्या प्रमाणावर लाभ देण्याच्या दृष्टीने इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

तथापि, अनुसूचित जमातीचे विद्यार्थी हे योजनेंतर्गत इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी इतर मराठी शाळांमध्ये शिक्षण घेत असतात. अशा विद्यार्थ्यांना योजनेंतर्गत इयत्ता १ ली नंतरच्या वरच्या टप्प्यांवर थेट प्रवेश दिल्यानंतर, त्यांना इंग्रजी माध्यमातून सुरूवातीपासून शिक्षण घेत असलेल्या इतर विद्यार्थ्यांच्या बरोबरीने अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता अतिरिक्त शिकवणी देऊनही मर्यादा येत होत्या. सबब, नामांकित शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या इतर विद्यार्थ्यांसमवेत सहशिक्षणाच्या माध्यमातून स्पर्धा होऊन योजनेंतर्गत प्रवेशित अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अधिक चांगली होण्याच्या दृष्टीने योजनेंतर्गत इयत्ता १ ली व २ री च्या सुरूवातीच्या टप्प्यामध्येच प्रवेश देण्याबाबत दि.२९.०५.२०१७ रोजी शासन निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) दुर्गम व डोंगरी भागात मुलींचे वसतिगृह बांधण्याबाबत

**(३७) * ८७२३४ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील दुर्गम व डोंगरी भागातील मुलींच्या वसतिगृहास मान्यता देऊन वसतिगृह बांधण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने सदर ठिकाणी पाहणी केली आहे काय,

(३) तसेच सदर पाहणीनुसार उक्त ठिकाणी वसतिगृह बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) अशी पाहणी केलेली नाही.

तथापि, शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेला अनुसूचित जमातीचा विद्यार्थी शिक्षणापासून वंचीत राहू नये म्हणून सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून इ.१२ वी नंतर उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट रक्कम जमा करण्याबाबत दि.१५.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये "पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना" सुरू करण्यात आलेली आहे.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील उंबरखेड शिवारात १३२ केव्ही सबस्टेशनपासून ३३ केव्ही केंद्रापर्यंत विद्युत लाइनचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(३८) * ८८७४५ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील उंबरखेड शिवारात सात वर्षांच्या कालावधीनंतर महापारेषण कंपनीकडून १३२ केव्ही सब स्टेशनचे काम पूर्ण करण्यात आले असून मा.उर्जामंत्री यांनी दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी त्याचे उद्घाटनही केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सबस्टेशनपासून ३३ केव्ही केंद्रापर्यत ६ किमी पर्यंतची विद्युत लाईन अदयापही अपूर्ण असल्यामुळे वीज उपलब्ध असूनही या केंद्रातून पुढे वीजपुरवठा करणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन निर्धारित वेळेत काम पूर्ण न करणा-या संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्यासोबतच या सबस्टेशनचे उर्वरित काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अदयाप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे,

(२) महापारेषण कंपनीतर्फे सदर उपकेंद्रात महावितरण कंपनीसाठी आठ ३३ के.व्ही. बे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. नविन १३२/३३ के.व्ही. उंबरखेड उपकेंद्र (देऊळगावराजा) या उपकेंद्रावर भार घेण्यासाठी १३२/३३ के.व्ही. उंबरखेड उपकेंद्र (देऊळगाव राजा) ते ३३/११ के.व्ही.देऊळगाव राजा उपकेंद्र यासाठी उभारणी करण्यात आलेली ६ किमी पर्यंतची ३३ के.व्ही. वाहिनी दि. २६.०५.२०१७ रोजी कार्यान्वीत करुन त्यावर ३३/११ के.व्ही. देऊळगांव राजा उपकेंद्र (२x५एमव्हीए) तसेच ३३/११ के.व्ही. गिरोली उपकेंद्र (२x५ एमव्हीए) असा एकूण २० एमव्हीएचा भार घेण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील दुषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(३९) * ८६००५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील टाकाऊ कोळशातून निघणारे दूषित पाणी तसेच वीज निर्मिती संचातून निघणा-या राखेचे पाणी कोणतीही प्रक्रिया न करता वेंडली नाल्यात सोडण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हजारो लिटर फर्नेस ऑईल वेंडली नाल्यात सोडल्यामूळे सदर वेंडली नाल्यातील दुषित पाणी इरई नदीत जात असून नदीतून शहरात पाणी पुरवठा होत असल्यामूळे चंद्रपूरातील हजारो नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची माहिती दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई आणि चंद्रपूर महानगरपालिकेने चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राला नोटीस बजावली असून या गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी करून संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही,

चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अद्ययावत तीन ईटिपी प्लांट सतत कार्यरत असतात व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर राख हाताळणीसाठी करण्यात येतो. सदर विद्युत केंद्रातील सांडपाणी नाल्यामध्ये सोडले जात नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आदिवासी समाजातील स्वयंसहाय्यता बचत गटांना कुक्कूटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याबाबत**

**(४०) * ८५९३४ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समाजाची आार्थिक उन्नती व्हावी यासाठी स्वयंसहाय्यता बचत गटांना कुक्कूटपालन व्यवसायाचे प्रशिक्षण सन २०१३-१४ या वर्षामध्ये देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक बचत गटाच्या नावे १० लाखांचा निधी वाटप करण्यात आला असून आदिवासी विकास विभागाच्या चारही अप्पर आयुक्त कार्यालयांतर्गत ४० बचत गटांना या निधीचे वाटप केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन वर्षानंतर पोल्ट्री फार्म किंवा बचत गट यापैकी काहीही अस्तित्वात नसल्याची माहिती दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, पोल्ट्री फार्मच्या नावे सुमारे ४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले असून शासनाने या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१३-१४ या वर्षात विशेष केंद्रीय सहाय्य योजने अंतर्गत जनउत्कर्ष, जनउत्थान महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत स्थापन करण्यात आलेल्या अथवा नव्याने स्थापित झालेल्या आदिवासी स्वयंसहाय्यता बचत गटांना व्यवसायाकरीता पोल्ट्री फार्म स्थापन करुन देणे व प्रशिक्षण देणे ही योजना मंजुर आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर योजने अंतर्गत प्रती बचतगट रु.१०.०० लक्ष प्रमाणे १६० बचतगटांसाठी निधीचे वाटप केले आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि त्याबाबतची बातमी दिनांक ४/५/२०१७ रोजीच्या दैनिक लोकमत अमरावती वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(४) प्रस्तूत बातमीच्या अनुषंगाने चारही अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना दि.१५/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये चौकशीचे निर्देश देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील गुहागर शहरात भूमिगत विदयुत केबल टाकण्याबाबत

**(४१) * ८६०२२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय वादळ भय उपशमन योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्हयातील सागरी किनारपट्टीवर असलेल्या गुहागर शहरातील विदयुत केबल भूमिगत करण्याचे काम प्राधान्याने करण्यात येईल, असे आश्वासन मा. मंत्री, उर्जा यांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाच्या प्रस्तावास मान्यता मिळाली आहे काय,
(३) असल्यास, विदयुत केबल भूमिगत करण्याचे काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, तसेच या कामाची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प (NCRMP) या योजनेअंतर्गत महाराष्ट्राच्या समुद्र किनारपट्टीलगतच्या चार जिल्ह्यातील एकूण १२ ठिकाणे सदर कामासाठी प्रस्तावित करण्यात आली होती. त्यामध्ये गुहागर शहराचा समावेश होता. या योजनेअंतर्गत उपरी तारमार्ग भूमिगत करण्याच्या कामासाठी केंद्र शासनाने एकूण रु. २०० कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. निधीची मर्यादा लक्षात घेता जागतिक बँकेने प्रस्तावित १२ ठिकाणांपैकी रत्नागिरी (जि. रत्नागिरी), अलिबाग (जि. रायगड) व सातपाटी (जि. पालघर) या ठिकाणांची निवड केलेली आहे.
सदर योजनेअंतर्गत गुहागर शहरातील एकूण रु. ७५.२८ कोटीच्या प्रस्तावित कामासाठी अतिरिक्त निधी मंजूर करण्याकरिता महावितरण कंपनीकडून प्राप्त झालेला प्रस्ताव महसूल व वन विभागामार्फत त्यांच्या दि. २५.०४.२०१६ च्या पत्राद्वारे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकार यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला होता. परंतु राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकार यांनी त्यांच्या दिनांक १६.०५.२०१६ च्या पत्राद्वारे असे कळविले आहे की, प्रथम मंजूर असलेल्या तीन ठिकाणांसाठी (रत्नागिरी, अलिबाग व सातपाटी) निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मंजूर निधीपैकी काही निधी शिल्लक राहिल्यास गुहागर शहराच्या प्रस्तावासंदर्भात विचार करण्यात येईल.

-----------------

## मंगळवेढा (जि. सोलापूर) तालुक्यातील शेतक-यांच्या शेतीपंपांना विजेची जोडणी देण्यात आली नसल्याबाबत

**(४२) * ८८०४१ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील १३८६ शेतक-यांनी सात वर्षांपूर्वी महावितरण कंपनीकडे अनामत रक्कम भरुनही त्यांच्या शेतीपंपांना अद्याप वीजेची जोडणी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) त्यानुसार सदरहू बाबीची पूर्तता शासनाने अद्याप पर्यंत न करण्याची कारणे काय आहेत तसेच प्रश्न भाग (१) मधील नमूद बाबीची पूर्तता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये महावितरण कंपनीने राबविलेल्या महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत मंगळवेढा तालुक्यामध्ये एकूण २५८७ कृषी ग्राहकांनी वीज पुरवठयासाठी अनामत रक्कम भरली होती. या सर्व २५८७ कृषी ग्राहकांना केबलद्वारे वीज पुरवठा करण्यात आला आहे. त्यापैकी ५८५ कृषी ग्राहकांना खांब व तारा ओढून रितसर वीज पुरवठा करण्यात आला आहे व अद्याप २००२ कृषी ग्राहकांसाठी खांब व तारा ओढून रितसर वीज पुरवठा करावयाचे प्रलंबित आहे.
(२) व (३) "महावितरण आपल्या दारी" या योजनेअंतर्गत ज्या कृषी ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात आलेला आहे त्यांना इन्फ्रा-२, दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना इ. योजनेमधून निधीच्या उपलब्धतेनुसार वीज जोडणी देण्याची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### कोयनावेळे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील मोडकळीस आलेले विजेचे खांब बदलण्याबाबत

**(४३) * ८५०८६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील कोयनावेळे (ता.पनवेल, जि.रायगड) गावात ५० वर्षांपूर्वी टाकलेले मोडकळीस आलेले विजेचे खांब तातडीने बदलून देण्याची

मागणी ग्रामस्थांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, एमएसईबी, भिंगारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या शहरातील वीजवाहिन्या भूमिगत करण्याचा प्रस्ताव मागील पाच वर्षापासून प्रलंबित असून त्यामुळे पनवेल शहरात सर्वत्र वीजवाहिन्या धोकादायक स्थितीत असल्याचे दिनांक ६ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेलसाठी स्वंतत्र उपकेंद्र नसुन उघडया वीजवाहिन्या तारांमध्ये अनेकदा तांत्रिक दोष निर्माण होतो व त्यामुळे वीजपुरवठा खंडित होतो तसेच उघडया वीजवाहिन्यांमुळे नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोयनावेळे (ता.पनवेल, जि.रायगड) गावात मोडकळीस आलेल्या विजेच्या खांबामुळे विज खंडीत होणे, आग लागणे अशा घटना वारंवार घडणे या प्रकारांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्युत खांब तातडीने बदलण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच प्रश्न भाग २ मधील नमूद शहरातील वीजवाहिन्या भूमिगत करण्याच्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) पनवेल शहरातील उच्चदाब व लघुदाब वाहिन्या भूमिगत करण्याच्या दृष्टीने तांत्रिक व्यवहार्यता तपासून प्रस्ताव महावितरण कंपनी मार्फत तयार करण्यात येत आहे.

(३) पनवेल शहरासाठी २२/२२ के.व्ही. भिंगारी व ३३/२२ के.व्ही कल्पतरु ह्या उपकेंद्राद्वारे वीज पुरवठा केला जातो. २२/२२ के.व्ही. भिंगारी उपकेंद्रातून पनवेल १, पनवेल ३ व साईनगर आणि ३३/२२ के.व्ही. कल्पतरु उपकेंद्रातून पनवेल २ या उपरी वाहिन्यांद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. पावसाळयाच्या सुरवातीच्या काळात वादळी वाऱ्यामुळे वीज वाहिन्यांमध्ये बिघाड होऊन वीज खंडित होण्याच्या घटना घडल्या होत्या.

(४) कोयनावेळे गावातील जुन्या व गंजलेल्या पोलचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून त्यानुसार २३ एल. टी. पोल बदलण्याचे काम व १.२ किमी जुनी लघुदाब वीज वाहिनी बदलण्याचे काम पं. दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना भाग-२ मध्ये प्रस्तावित करण्यात आले असून सदर कामासाठी निविदा प्रक्रिया सुरु असून निविदा मंजूरीनंतर सदर काम करण्यात येईल.

(५) यासंदर्भात महावितरण कंपनीकडून प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील गतिमंद मुलांसाठी वसतीगृहातील अनुदानाची रक्कम वाढविण्याबाबत

**(४४) * ८४९९८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील 'सत्कर्म' वसतीगृहातील मुलांचा भुकेने आणि कुपोषणामुळे मृत्यू झाल्याच्या घटनेप्रकरणी राज्यातील गतिमंद मुलांसाठीच्या वसतीगृहातील प्रत्येक मुलामागे दिली जाणारी अनुदानाची रक्कम वाढवून बालगृहांची संख्या वाढविण्यात यावी, असे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिनांक ८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुलांसाठीची वसतीगृहे तसेच बालगृहांची असलेली दयनीय स्थितीची गंभीर दखल घेऊन शासनास उचित कार्यवाही करण्याचे आदेशही दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार महाराष्ट्र राज्य समन्वय समितीच्या सदस्यांसह मतिमंद क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती व संस्थांची आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली

होती. सदर बैठकीतील चर्चा तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार परिपोषण रक्कमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पाडळी व हतेडी (ता. जि. बुलढाणा) येथील वीज उपकेंद्रात वारंवार बिघाड होत असल्याबाबत

**(४५) * ८६९३० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पाडळी व हतेडी (ता. जि. बुलढाणा) येथील विद्यूत उपकेंद्रात कमी गुणवत्तेचे इन्सूलेटर वापरल्याने तेथे वारंवार बिघाड होत असल्याची बाब दि. ४ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमी दर्जाच्या इन्सूलेटरचा वापर केल्याने या उपकेंद्रातंर्गत येत असलेल्या मौजे देऊळघाट व इतर चाळीस गावात (ता. जि. बुलढाणा) माहे जून, २०१७ च्या पहिल्या व दुस-या आठवड्यात अनेक वेळा वीज बंद होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(४) यानुसार मौजे पाडळी व हतेडी येथील विद्यूत उपकेंद्राचे नुतनीकरण तसेच दर्जा वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) बुलढाणा जिल्हयामध्ये दि. ०४ जून, २०१७ रोजी हतेडी व पाडळी तसेच परिसरात वीजेचा कडकडाट व चक्री वादळ येऊन मुसळधार पाऊस झाला. या नैसर्गिक आपत्तीमुळे महावितरण कंपनीच्या ३३ के.व्ही., ११ के.व्ही. वीज वाहिन्यांची मोठया प्रमाणात हानी झाली.
(२) जून, २०१७ च्या पहिल्या व दुसऱ्या आठवडयात मौजे पाडळी व हतेडी तसेच परिसरात पाऊस व वीजेच्या कडकडाट अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमुळे वीजवाहिनीवर वीज (Lightening) पडून ३३ के.व्ही., ११ के.व्ही. वाहिन्यांचे मोठे नुकसान झाले व त्यामुळे मौजे पाडळी, हतेडी, देऊळघाट, अंबोडा व इतर अशी २९ गावे बाधित झाली व दुरुस्तीसाठी साधारणत: २५ तासांचा कालावधी लागला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पाडळी उपकेंद्र येथे सन २०१०-११ मध्ये पॉवर ट्रान्सफार्मरची क्षमता वाढविण्यात आली आहे. तसेच हतेडी उपकेंद्र येथे ५ एमव्हीए क्षमतेचा अतिरिक्त पॉवर ट्रान्सफार्मर (रोहित्र) बसविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामीण भागात कृषी विद्युत जोडणीचे उभारण्यात आलेले सिमेंट खांब निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(४६) * ८८०७० ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथे ग्रामीण भागात कृषी विद्युत जोडणीचे उभारण्यात आलेले सिमेंट पोल निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार केली परंतू आजपावेतो कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) यासंदर्भात मा. लोकप्रतिनिधींचे दिनांक १९.०५.२०१६ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

तिवसा उपविभागामध्ये माहे मे, २०१६ मध्ये अतिवृष्टी व वादळ पावसामुळे लघुदाब व उच्चदाब वाहिनींवर मोठी झाडे व फांद्या तुटून पडल्यामुळे उच्चदाब वाहिनीचे एकूण १६ पोल व लघुदाब वाहिनीचे एकूण १३५ पोल पडले होते. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता. सदर पोलच्या दर्जाची पडताळणी केली असता सदर पोल हे निकृष्ट दर्जाचे आढळून आलेले नाहीत. सदर प्रकार हा

नैसर्गिक आपत्तीमुळे झाला होता. त्यामुळे खंडित झालेला वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी युध्दपातळीवर काम पूर्ण करुन वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्यात आला आहे. सदरचे पोल नैसर्गिक अतिवृष्टीमुळे पडले असल्यामुळे कंत्राटदारावर कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात कृषी पंपाच्या वीजदरात करण्यात आलेली वाढ**

**(४७) * ८५१५५ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य वीज नियामक आयोगाने माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये ४ टप्प्यांमध्ये कृषी पंपाची वीज दरवाढ करण्याच्या दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने महावितरणने दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून कृषी पंपासाठी लागणा-या विजेच्या दरात वाढ करुन नवीन दर लागू केले असून वीजदरात माहे एप्रिल २०१७ पासून अडीचपट वाढ करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिटर असलेल्या व नसलेल्या कृषी पंपासाठी अश्वशक्तीनुसार किती नवीन दरवाढ करण्यात आली आहे,

(३) तसेच शेतक-यांच्या कृषी पंपासाठी लागणा-या वीजेच्या दरवाढीचा आर्थिक भार शासनाने उचलावा असा प्रस्ताव महावितरणने शासनास पाठविला असून याबाबतच्या प्रस्तावावर आतापर्यंत काय निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, सदर वीज दरवाढीमुळे राज्यभरातील शेतकरी त्रस्त झाले असून याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार कृषी पंपाचे वाढीव वीज दर रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ३/११/२०१६ च्या वीजदर आदेशानुसार सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीसाठी नविन वीज दर जाहीर केले आहेत. दि. १/०४/२०१७ पासून लागू करण्यात आलेली वीज दरवाढ दि. १/११/२०१६ च्या वीज दराच्या तुलनेत मीटर असलेल्या व मीटर नसलेल्या कृषी ग्राहकांकरिता अनुक्रमे ३.५% व ५.२% इतकी वाढ आहे.

(३) व (४) शासन निर्णय दि. ११/१०/२०१२ अनुसार वीज दर सवलतीसाठी शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाची मर्यादा कायम असून वीज दरवाढीचा भार संबंधित कृषीपंप ग्राहकाने भरावयाचा आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी महामंडळाकडून आदिवासी शेतकऱ्यांना हिरडा विक्रीसाठी घालण्यात येणाऱ्या जाचक अटींबाबत

**(४८) * ८६३९४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाने हिरडा खरेदीसाठी पुणे जिल्ह्यातील जून्नर, आंबेगाव, खेड तालुक्यांसह अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात माहे मे, २०१७ मध्ये एकूण २२ केंद्रे सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदी केंद्रांवर हिरडा विक्री करताना सातबाराची अट घातली जाते व आठवड्यातून केवळ एक दिवस ही केंद्रे सुरु ठेवली जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी शेतकऱ्यांना या अटी जाचक ठरत असून शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार खरेदी केंद्रांवर हिरडा विक्री अधिक सुलभ होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

हंगाम २०१६-१७ साठी माहे ऑक्टोबर,२०१६ मध्ये पुणे जिल्हयातील जुन्नर, आंबेगांव व खेड तीन तालुक्यातील ११ खरेदी केंद्र व अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यातील १३ खरेदी केंद्रे अशी एकुण २४ खरेदी केंद्र सुरु करण्यात आली.

(२) अंशत: खरे आहे. खाजगी व्यापाऱ्यांनी या योजनेचा गैरफायदा घेवु नये. म्हणुन ३०.०३.२०१३ रोजी ७/१२ घेण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या. परंतु खरेदी करणारे संस्थेचे व महामंडळाचे कर्मचारी स्थानिक असल्याने शेतकरी व आदिवासी यांना ओळखत असल्यामुळे हिरडा खरेदी करीता शेतकऱ्यांकडुन ७/१२ उता-याची सक्ती केली जात नाही. बाजाराच्या दिवशी हिरडा विक्रीस येतो त्यामुळे त्या दिवशी खरेदी केली जाते.

(३) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नसल्याबाबत

**(४९) * ८५१२० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन**

**सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनू.जाती व इतर मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जमाती आणि ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागाकडून मिळणा-या शिष्यवृत्तीपासून सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील ८ लाख २० हजार म्हणजे ४९ टक्के विद्यार्थी वंचित राहिले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच रायगड जिल्ह्यातील अनुसूचित जाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील सुमारे १४ हजार विद्यार्थ्यांना निधी उपलब्ध झाला नसल्यामुळे सन २०१६-१७ या वर्षाची शिष्यवृत्ती प्राप्त झाली नसल्याची बाब दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर विभागाअंतर्गत चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गोंदिया, गडचिरोली व भंडारा जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाअंतर्गत देण्यात येणारी मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती सन २०१६-१७ या वर्षात ३,५७,८६५ विद्यार्थ्यांना अर्ज करूनही महाविद्यालयाच्या निष्काळजीपणामूळे ५८,६४१ विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित असून जिल्हा पातळीवर ५७,७९६ विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित असल्याचे दिनांक ४ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिष्यवृत्ती प्रदानासाठी सुमारे २८ कोटी रुपये इतका निधी शासनाकडून मिळणे अपेक्षित असल्याचे सामाजकल्याण आयुक्तालय प्रशासनाकडून सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ही परिस्थिती पुन:श्च निर्माण होऊ नये याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: होय.

(२) व (३) अंशत: होय.

(४) अशी बाब नाही.

(५) सन २०१७-१८ पासून शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क योजनेची कार्यवाही शासनाच्या DBT पोर्टलवरुन कार्यान्वित करण्यात येत आहे.

-----------------

**शासनाने साखर कारखान्यांना २०० कोटीचे कर्ज मंजूर केल्याबाबत**

**(५०)** * *८५००५* **श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या थकहमीच्या आधारे २५ साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाची थकबाकी वसूल करण्यास अनेक अडचणी येत असून ऊस लागवडीत घट, साखरेच्या अस्थिर किंमती यामुळे साखर कारखाने संकटात असताना मुंबई जिल्हा सहकारी बँकेने,कॉर्पोरेट कर्ज धोरणांतर्गत सदरहू साखर कारखान्यांना पुन्हा २०० कोटींचे कर्ज मंजूर केल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू साखर कारखान्यांनी आधीच्या कर्जाची परतफेड केली नसून मुद्दल व व्याजाची ३०० कोटींची थकबाकी कायम असताना, मुंबई जिल्हा बँकेने सदरहू कारखान्यांना सुमारे २०० कोटींचे कर्ज मंजूर करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कोणत्या अधिनियम व नियमाच्या आधारे शासनाने मुंबई जिल्हा बँकेस २०० कोटी रुपये कर्ज मंजूर करण्यास मान्यता दिली आहे,

(४) असल्यास, ठेवीदारांची अनामत रक्कम सुरक्षित ठेऊन त्यास संरक्षण मिळावे याकरीता, शासनाने उक्त कर्ज मंजूर प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.